# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 30/04/2016 (का.प.क्र.15) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक 30 एप्रिल 2016 (का.प.क्र.15) रोजी मा.सभापती श्री.थोरात दिलीप गंगाधर यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.40 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
02. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
03. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
04. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
05. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
06. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
07. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
08. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
09. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
10. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
11. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
12. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
13. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
14. स.स.श्रीमती रेश्मा अशफाक कुरैशी

श्री.गजानन बारवाल :शेवटची सभा आहे. 8 स.सदस्य निवृत्त होत आहे. सभागृहात शहराच्या विकासा संदर्भात चर्चा झालेली आहे. विकासाच्या दृष्टीने सभागृहाने निर्णय घेतले. मा.सभापती यांच्या कार्यकाळात तीन आयुक्त महानगरपालिकेस मिळालेले आहे. LED संदर्भात मा.उच्च न्यायालयाने नोटीस पाठवलेली आहे. Contemt of Court ची नोटीस दिलेली आहे.

श्री.नितीन चित्ते :मा.सभापती यांनी आपला कार्यकाळ व्यवस्थीत पार पडलेला आहे. सर्वांना सोबत घेवून कामकाज पार पाडलेला आहे. सर्व अधिकारी वर्गाने सहकार्य केले. मा.सभापती यांचा कार्यकाळ पुर्ण करण्यात सर्वांनी सहकार्य केले, त्या सर्वांचे अभिनंदन करण्यात येते. LED संदर्भात सुप्रिम कोर्टाने स.सदस्यांना नोटीस दिलेली आहे. प्रशासनाने प्रस्ताव ठेवतांना काही त्रुटी राहिलेल्या आहेत. मा.न्यायालयाची अशी धारणा झालेली आहे का की, मा.न्यायालयाचा अवमान झालेला आहे. असे असेल तर LED बाबतचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा आणि रितसर प्रस्ताव सादर करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :नोटीस ही व्यक्तीशः मिळालेली आहे. हा सर्व स.सदस्यंनी घेतलेला निर्णय होता. विधी सल्लागार यांचेकडून माहिती घेण्यात यावी. प्रस्ताव हा प्रशासनाने ठेवला आहे.

मा.सभापती :विधी सल्लागार सभागृहात आल्यानंतर खुलासा घेण्यात येईल, तोपर्यंत इतर बाबत चर्चा करण्यात यावी.

श्री.गजानन मनगटे :भुमिगत गटार योजनेचे काम किती कि.मी.पर्यंत झाले? खुलासा करण्यात यावा. कोणकोणत्या वार्डामध्ये काम झाले ?

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) :अंतर्गत जलवाहिनीचे कामे तुर्तास बंद केलेले आहे. मेन सिव्हरचे कामे चालु आहे.

श्री.रावसाहेब आमले :कोणकोणत्या वार्डात किती कि.मी.ची लाईन टाकण्यात आली आहे?

कार्यकारी अभियंता :भुमीगत गटार योजने अंतर्गत शहरात काम बंद आहे. मेन सीव्हरचे काम करण्यात येते आहे. केंद्र शासनाने निधीमध्ये 110 कोटीची कपात केलेली असल्यामुळे सध्या अंतर्गत जलवाहिनीचे कामे थांबविण्यात आलेली आहे. पुर्वी शासनाकडून 80:10:10 टक्के प्रमाणे केंद्र राज्य आणि मनपाचा हिस्सा या प्रमाणात होते आता निधीमध्ये कपात केलेली असल्यामुळे तसेच योजना UIISDM मधून योजना अमृतमध्ये वळती करण्यात आलेली आहेञ आता निधीचे प्रमाण 60:20:20 या प्रमाणात केंद्र, राज्य आणि मनपा यांचा सहभाग आहे. 37 कि.मी.चे मेन सिव्हरचे कामे करण्यात आलेली आहे.

श्री.मनगटे गजानन :मुस्लीम बहुल भागातच (वॉर्डामध्ये) काम केलेले आहे. इतर वार्डोमध्ये काम करायचे नाही का?

मा.सभापती :स.सदस्य यांच्या वॉर्डातुन मेन सिव्हर जाते का?

कार्यकारी अभियंता :स.सदस्य यांच्या वॉर्डातुन मेन सिव्हर लाईन जाते. सर्वे केलेले आहे. नॅशनल ॲथोरिटी ऑफ इंडिया यांनी ह्या ठिकाणी काम सुरु केलेले आहे, संचालक यांचेशी चर्चा केलेली आहे की, रस्त्याचे काम थांबवा मेन सिव्हरचे काम चालु आहे. या संदर्भात मा.आयुक्त महोदय यांच्या दालनात बैठक झालेली आहे. प्रत्यक्ष व्हिजीट देणार आहे, काम करण्यची परवानगी मागीतली आहे. 45 मीटर से.मी.पासुन लाईन टाकण्या संदर्भात सुचना केलेली आहे. परंतु जागा मनपाच्या ताब्यात नाही.

मा.सभापती :या संदर्भात सुचना करण्यात येते की, सर्वे करन मेन सिव्हरेज काम करणे संदर्भात कार्यवाही/काम करण्यात यावी. संबंधीत अधिकारी यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्ष व्हिजीट देवून काम करण्यात येईल.

श्री.गजानन मनगटे :अंतर्गत वाहिनीचे काम थांबविण्यात आलेले आहे. हा कुणाचा निर्णय आहे?

कार्यकारी अभियंता :शासनाने निधीमध्ये कपात केली असल्याने प्रशासनाने घेतलेला निर्णय आहे.

श्री.नितीन चित्ते :भुमिगत गटार योजनेचे काम अतिशय चांगल्या रितीने काम करण्यात येत आहे. तत्कालीन सभापती श्री.नारायण कुचे यांचे कार्यकाळात ही योजना मा.स्थायी समिती मध्ये ठेवण्यात आले होते. त्यावेळेस शासनाने निधीची तरतुद केलेली होती, काही वार्डामध्ये अंधाधुंद काम करण्यात आले. केंद्र शासनाने 109 कोटींची या योजने मध्ये कपात केलेली आहे. 4 अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकण्याचे कमी केलेले आहे. अंतर्गत ड्रेनेजच्या कामासाठी बजेटमध्ये तरतुद करणे आवश्यक आहे. नागरीकांना या बाबत गैरसमज झालेला आहे.

(वर्तमान पत्रामध्ये दिले होते की, प्रत्येक नगरसेवकाला 50 लाख रुपयांची कामे करण्यात येईल, बजेट मधील कामे झाली पाहीजे. प्रत्येक नगरसेवकाला दिलेले बजेट खर्च करण्यात यावे )

मा.सभापती :अंतर्गत ड्रेनेजचे काम करण्यात यावे.

श्री.अ.रहीम नाईकवाडी :मा.स्थायी समितीची सभा घेणे आवश्यक होते. एका वर्षातुन 52 बैठका होणे अपेक्षित आहे. वेळोवेळी मा.स्थायी समितीने दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात

आलेले नाही. समांतर कंपनीने 18% व्याज आकारणी करीत आहे. प्रत्येक कनेक्शनच्या पाठीमागे 1500 रुपये आकारण्यात येतो. संस्थेचा उद्देश No Profit No loss मध्ये असला पाहिजे, रस्त्यावरील अतिक्रमणामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. परंतु यावर तोडगा निघु शकलेला नाही. शॉपींग कॉम्पलेक्स मधील बीअर बारच्या दुकानावर कार्यवाही झाली नाही. मा.सभापतींच्या आदेशाचे पालन झालेले नाही. जनतेने निवडुन दिलेले आहे. त्यांच्या काही अपेक्षा असतात. माझा अनुभव हा वाईट आहे. समांतर बाबत विशेष सभा बोलविण्याबाबत फक्त चर्चा झाली.

श्रीमती शेख समिना इलियास : समांतरला जी नोटीस दिली त्या प्रतीची मागणी केली होती. परंतु अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही.

कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे) : याबाबत ताबडतोब उत्तर देण्यात येईल.

श्री.अ.रहीम नाईकवाडी :शहरात हजारो लिटर पाणी वाहत आहे. लिकेजेस बंद केलेले नाही.

कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे) :या बाबत संबंधीत अभियंता यांना माहिती दिली. लाईन ब्रेकअप करणे बाबत सांगण्यात आले.

मा.सभापती :समांतर कडून लिकेजेसचे काम त्वरीत होत नाही, माझा स्वतःचा अनुभव आहे.

श्री.अ.रहीम नाईकवाडी :याबाबत मोबाईल क्लिप सभागृहात दाखविण्यात येते.

मा.सभापती :स्थयी समिती समोर याबाबतचा अहवाल ठेवण्या यावा.

श्री.नितीन चित्ते : वार्ड निहाय जलवाहिनी किती टाकली? व जुन्या जोडणीची परत नविन जोडणी बाबत वसुली तसेच ज्या ठिकाणी जलवाहीनी टाकली, रस्ता खोदला तो रस्ता दुरुस्तीची जबाबदारी कंपनीची आहे का? की मनपाची या बाबतची माहिती तात्काळ मिळालेली नाही. कॉंक्रीटीकरणा संदर्भात उत्तर दिले की, 46 हजार मिटर काम केले आणि 500 मिटरचे कॉंक्रीटीकरण केले. 4 वार्डामध्ये कॉंक्रीटीकरणाचे काम केले.

समांतरने commercial आणि non commercial चा धंदा सुरु केला आहे. माझ्या वार्डातील नागरीक Residential भागात राहतात. त्यास व्यवसायीक ने बिल देण्यात आले आहे. पडताळणी फिस आकारण्यात येते. समांतरकडे मनपाचा तांत्रिक स्टाफ परत केलेला आहे.

मा.सभापती :पडताळणी फिस व स्टाफ बाबत खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे) :पडताळणी फिस ही मान्यतोप्रामणे आहे. नविन कनेक्शनसाठी तपासणी फी आहे. 6 महिन्यासाठी समांतरने सटाफची मागणी केली त्यानुसार महानगरपालिकेचा स्टाफ समांतरला दिला होता करारनाम्यानुसार आता स्टाफ परत केला आहे. 16 कर्मचाऱ्यांपैकी 6 कर्मचाऱ्यांची अतिक्रमण विभागाकडे वर्ग केलेली आहे.

श्री.नितीन चित्ते :मनपाचे समांतरच्या पाणीपुरवठयावर नियंत्रण असले पाहिजे म्हणून हा स्टाफ दिला होता.

मा.सभापती :माझ्या वार्डात स्टाफ आलेला नाही.

श्री.नितीन चित्ते :व्याज आकारणी थांबली पाहिजे, वॉर्ड-ब कार्यालयात पाणीपट्टी भरणा संदर्भात जातात नागरीकांना वॉर्डाच्या ठिकाणी पाणी पिण्यासाठी, तसेच बसण्यासाठी जागा उपलब्ध नाही. अशा प्रकारची सुविधा महानगरपालिका प्रशासन थकबाकीदारांना देण्यात येत आहे. दरवर्षी 10% नैसर्गिक वाढ याप्रमाणे 3685/- रुपये होतात (दरमहा) परंतु प्रत्येक कनेक्शन मागे 15 रुपये जास्त घेण्यात येते. 1 लाख 25 हजार नळ कनेक्शन आहेत. 18 कोटी 75 हजार जास्तीचे जातात.

कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे) :बायलॉजनुसार मंजुर रेटनुसार आकारण्यात येते.

श्री.नितीन चित्ते :समांतर कंपनी 10 ते 15 रुपये जास्तीचे आकारण्यात येत आहे. बिल भरणा करण्यासंदर्भात वारंवार एस.एम.एस. येतात. यावर प्रशासनाचे नियंत्रण असणे महत्वाचे आहे. नागरीकांच्या भल्यासाठी ही योजना होती, मला या पापात पडायचे नाही. पाण्याच्या बाबतीत जे धोरण अवलंबवले ते चुकीचे आहे. लोकांची आपण हाय घेत आहोत. समांतर बाबतीत प्रशासनाने व्यवस्थीत धोरण ठरविण्यात यावे. सिस्टीम बाबत कमिटी स्थापन करण्यात यावे. समांतरला हे जमत नसल्यास त्यांना रवाना करण्यात यावे.

श्रीमती शेख समिना :करारामध्ये स्पष्ट नमुद केले आहे. कराराची अट 5.7 मध्ये अटी व शर्ती समांतरणे परीपुर्ण पाळल्या नाही तर मनपाने करार रद्द करावा म्हणून नमूद केलेले आहे.

श्री.विकास प्रकाश एडके :बिला बाबतीत पुर्वी जे बिल येत होते त्या प्रमाणात देण्यात यावे. 1500 रुपये जास्तीचे पैसे आकारण्यात येते, यावर नियंत्रण असणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे) : कंपनीचे अंतर्गत ऑडीटर नेमलेले आहे. श्री.कैलास केजरीवाल यांची नेमणूक केलेली आहे.

मा.सभापती :गेल्या वर्षाचे कंपनीचे ऑडीट झालेले आहे. त्याची प्रत स.सदस्यांना देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे) :समांतरने ऑडीटर नेमलेले आहे.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :तपासणी फिस 1500/- रुपये रद्द करण्यात यावे.

मा.सभापती :या सर्व बाबींचा खुलासा करण्यात यावा.

श्री.गजानन मनगटे :माझ्या वॉर्डात नळाला पाणी नाही. नळ कनेक्शन कट आहे. तरीही 20,000/- रुपये भरण्या संदर्भात मागणी होती.

मा.सभापती :नळ कनेक्शन नसेल, नळाला पाणी येत नसेल तर पाणीपट्टी घेण्यात येवू नये.

श्री.अ.रहीम नाईकवाडी :11 महिन्यांपासुन कामे झालेली नाही. म्हणून काळा दिवस म्हणून आम्ही मनवत आहे. इतिवृत्तांतातील मिनिट्स मध्ये चौकशी संबंधी आदेश दिले होते परंतु काही झाले नाही. नागरीकांची दिशाभुल करण्यात येते. सर्व मिनिट्सची पाहणी करण्यात यावी. एकही काम झालेले नाही.

श्री.गजानन बारवाल : विद्यी सल्लागार सभागृहात उपस्थित आहे. LED बाबत खुलासा करण्यात यावा, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत तसेच याबाबत प्रशासनाचे पुढचे धोरण काय असेल? खुलासा करण्यांत यावा.

मा.सभापती : स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना कंन्टेम्ट ऑफ कोर्टची नोटीस आलेल्या आहेत, सदर नोटीस का आल्या, त्याबाबतीत आता काय केले पाहीजे, खुलासा करण्यांत यावा.

विद्यी सल्लागार : तत्कालीन आयुक्त श्री.केंद्रेकर तसेच स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना LED या प्रकरणात नोटीसा प्राप्त झालेल्या आहेत.नोटीस निघाली आहे,प्राप्त झाली की नाही याबाबत माहिती नाही.सर्वांना नोटीसा तामील झाल्याशिवाय पुढील तारीख मिळणार नाही.

मा.सभापती : वैयक्तिक नोटीसा आलेल्या नाही. स्थायी समितीला नोटीस दिलेली आहे. स्थायी समितीचे 8 सदस्य निवृत्त होणार आहे, त्यांच्या नावानिशी नोटीसा आलेल्या आहेत, याबाबत त्यांची भुमिका तसेच आता त्यांनी काय केले पाहीजे.

विद्यी सल्लागार : याबाबत दोन सिनीयर काऊन्सलर लावण्याचे मान्य केलेले आहे. ॲडव्होकेट ऑफ रेकॉर्ड ही नियुक्त केलेले आहे. त्यांच्यामार्फत मा.सर्वोच्च न्यायालयात आपली बाजु मांडणार आहोत.

श्री.गजानन बारवाल : मा.सर्वसाधारण सभा, स्थायी समितीने हा निर्णय घेतलेला आहे. माझे वैयक्तिक मत आहे की, जर कोर्ट ऑफ कंन्टेम्ट झाले असेल तर आपण आपला घेतलेला निर्णय मागे घेण्यात यावा.

मा.सभापती : ज्यावेळेस हा ठराव ठेवला होता, त्यावेळेस निर्णय घेतला होता, त्यावेळेस मा.सर्वोच्च न्यायालयाच्या ही बाब निदर्शनास आणुन ती बाब रद्द करण्याची कार्यवाही करू. तत्कालीन मा.आयुक्त यांचेशी याबाबत चर्चा केली होती, परंतु मा.न्यायालय Entertent करेल की, नाही हे माहित नव्हते. प्रशासनाने जी भुमिका स्थायी समिती समोर ठेवली होती, ती म्हणजे आधी मा.सर्वोच्च न्यायालयाकडे जाणार आणि त्यानंतर रद्द करू अशी होती. आता कोणती भुमिका घ्यायची तसेच आठ सदस्य निवृत्त होणार आहे, याबाबत खुलासा करावा.

विद्यी सल्लागार : स्थायी समितीचे सदस्य राहीले नाही, तरी महानगरपालिकेची जबाबदारी आहे. कन्टेम्टच्या संदर्भात सभेने घेतलेला निर्णय आणि प्रशासनाने घेतलेला निर्णय चुकीचा नाही. हे मा.न्यायालयात सक्षमपणे भुमिका मांडली जाईल.

श्री.गजानन बारवाल : प्रशासनाने त्यांची भुमिका स्पष्ट करावी.

मा.सभापती : प्रशासनाची भुमिका रद्द करण्याच्या बाबतीत आहे. कारण महापालिकेचे यात मोठे नुकसान होणार होते, म्हणुन स्थायी समितीने त्या प्रस्तावास मान्यता दिली. त्यावेळेस निर्णय होता की, सदरील बाब ही मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणुन देण्यांत येईल. आजच्या स्थितीत स्थायी समितीने प्रस्ताव रद्द करून तसे मा.सर्वोच्च न्यायालयाला कळविण्यासाठी प्रशासनाने पुनश्चः प्रस्ताव स्थायी समिती समोर आणावा. त्यानुसार कन्टेम्ट मधुन सर्व सदस्य बाहेर येतील का?

विद्यी सल्लागार : याबाबत सांगण्यास मी सक्षम अधिकारी नाही. नोटीस प्राप्त झाली म्हणजे कन्टेम्ट झाला असे सिध्द होत नाही. आपली बाजू मा.न्यायालयापुढे मांडु.

मा.सभापती : मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय प्रकरणात तथ्य असल्याशिवाय प्रकरण स्विकारतच नाही, असे आमचे मत आहे.

विद्यी सल्लागार : त्यांनी त्यांची बाजू मांडली आहे. त्यानुसार नोटीस तामील केलेली आहे. आपण आपली बाजू मांडू. आपणांस बाजू मांडण्याची संधी अजून मिळालेली नाही.

श्री.नितीन चित्ते : प्रस्ताव ठेवल्यानंतर एकदा मंजुर झालेला प्रस्ताव पुन्हा सभेपूढे आणण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागेल, रद्द करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने आणावा.

मा.सभापती : वैयक्तिक नोटीसा आलेल्या आहेत. आठ स्थायी समिती सदस्य निवृत्त होत आहे.

श्री.गजानन बारवाल : मा.न्यायालयापूढे आपले म्हणणे आपण मांडलेले नाही.

विद्यी सल्लागार : (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' चे प्रकरण 2 (र) वाचुन दाखवतात.) दि.15/02/2016 रोजी ठराव झालेला आहे. कन्टेम्ट मध्ये बाय नेम पार्टी केले जाते.

श्री.नितीन चित्ते : यामध्ये काही प्रमाणात प्रशासनाची चुक असू शकते. मा.न्यायालयाची अशी धारणा झालेली आहे की, 16 सदस्यांनी कोर्टाची अवहेलना केलेली आहे. आज प्रस्ताव विखंडीत करू शकत नाही. परंतु मनपाचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणुन हा निर्णय घेण्यात आलेला होता. जर मा.न्यायालयास असे वाटत असेल की, न्यायालयाचा अवमान केला असेल तर आज आम्ही मा.न्यायालयाची माफी मागतो. पुढील कालावधीमध्ये प्रस्ताव रद्द करण्यासाठी ठेवण्यांत यावा.

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत होते. म्हणुन प्रशासनाने हा निर्णय घेतलेला आहे.आपली बाजु मा.न्यायालयात सक्षमपणे मांडावी. स.सदस्य श्री.नितीन चित्ते यांनी सांगितल्याप्रमाणे मा.न्यायालयाची माफी मागण्यास तयार आहे.

मा.सभापती : दिनांक 18/02/2016 रोजी प्रशासनाने ठेवलेला एलईडी संदर्भातील ठराव क्र.53 च्या बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होत आहे, असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे मत आहे, त्यानुषंगाने सभापतीसह सर्व स्थायी समिती सदस्यांना नोटीसा प्राप्त झालेल्या आहे. तसेच सभागृहात स.सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना लक्षात घेता मा.सर्वोच्च न्यायालयाची बिनशर्त माफी मागण्यात येते. तसेच ठराव क्र.53 रद्द करण्यांत येतो.

मा.सभापती :याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येईल.

श्री.विकास एडके :दि.11.01.2016 रोजी स्वच्छता निरीक्षक या कामाचा अनुभव आहे. या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करत असेलेल्या कर्मचाऱ्यांना प्र.स्वच्छता निरीक्षक पदाचा चार्ज दिलेला आहे. खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :S.I. ची भरती ही सरळ सेवेने भरती प्रक्रीयेद्वारे आहे. आस्थापनेवरील स्वच्छता निरीक्षक हे पद सरळ सेवेने भरण्याबाबत तरतुद आहे त्यानुसार तात्पुरती व्यवस्था म्हणुन एस.आय.ला आवश्यक असलेले कोर्स त्यांनी केला त्यांना तात्पुरत्या स्वरुपात कामकाज दिलेले आहे. आऊट सोर्सिंग ची व्यवस्था करण्याचे नियोजन आहे. बिंदु नामावली/आरक्षण याबाबी तपासणी आवश्यक असतात. सफाई आयोगाकडुन आक्षेप येतात त्यामुळे नियमानुसार सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

श्री.विकास एडके :1993 साली 5 लाख लोकसंख्योला 23 एस.आय. होते. आज 20 ते 25 लाख लोकसंख्येला अगदी कमी एस.आय. आहेत.

मा.आयुक्त :आस्थापनाचा खर्च हा जास्त आहे. त्यामुळे मालमत्ता कर वाढीसाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे भरती करत नाही. जवान यांना प्र.स्वच्छता निरीक्षक या पदाचा अतिरिक्त पदभार दिलेला आहे. ज्यावेळी भरती करण्यात येईल त्यावेळी संबंधीतांना प्राधान्य देण्यात येईल.

श्री.विकास एडके : औरंगपुरा येथे मनपाचे नाथसुपर मार्केट असून या मार्केट येथील जीन्या खालील छोटीशी जागा भाडेतत्वावर मिळणेकरीता श्री.कैलास सखाराम साबळे यांनी मागणी केलेली आहे. त्यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून उदरनिर्वाहासाठी संबंधीतांना नाथसुपर मार्केट येथील जीन्या खाली असलेली छोटीशी जागा झेरॉक्स मशिन चालविणेसाठी उपलब्ध करून देण्यांत यावी.

मा.सभापती : संबंधीताची परीस्थिती हलाखीची असल्याने नाथसुपर मार्केट येथे जीन्या खाली असलेली जागा त्यांना उदरनिर्वाहासाठी देण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

श्रीमती सलमा कुरेशी :भगवान शिक्षण प्रसारक मंडना बांधकामा बाबत कोणती कारवाई केली?

सहा.सं.नगर रचना :सदरील प्रकरणी शासनाकडुन स्थागित झालेली आहे. पुढील सुनावणी पर्यंत स्थगिती देण्याचे आदेशित आहे.

श्री.विकास एडके :स्थगिती केव्हा पर्यंत आहे?

सहा.सं.नगर रचना :पुढील सुनावणी पर्यंत स्थगिती देण्यात आलेली आहे.

श्री.विकास एडके :सिडको मधील चार ताळ्याची इमारत तोडण्यात आली.

| | |
|---|---|
| सहा.सं.नगर रचना | :शासनाचे यांसंदर्भात पत्र आहे. |
| श्रीमती शेख समिना | :40 दिवस झालेले आहे. त्यानंतर पुढे काय? |
| सहा.सं.नगर रचना | :सदर प्रकरण शासन दरबारी आहे. |
| श्री.गजानन बारवाल | :सदरील प्रकरणात शासनाने स्थगिती देलेली आहे. |
| मा.सभापती | :संबंधीत अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती आहे. त्यामुळे त्यामध्ये हस्तक्षेप करण्याची गरज नाही. |
| श्री.विकास एडके | :स्टे असतांना चार मजली इमारत पडण्यात आली. |
| मा.सभापती | :याबाबत कन्टेम्प्ट होईल. |
| श्री.रावसाहेब आमले | :सरोज शाळेच्या इमारतीला एकाच मजल्याची परवानगी आहे. तसेच टॅक्सही एकाच मजल्याला लागलेला आहे. शाळेची इमारत चार मजली आहे. |
| सहा.सं.नगर रचना | :याबाबत पाहणी करुन निर्णय घेण्यात येईल. |
| श्री.रावसाहेब आमले | :या बाबत कोणती कारवाई केली? |
| सहा.सं.नगर रचना | :परवानगी बाबत तपासणी करण्यात येईल. |
| मा.सभापती | :अनाधिकृत असल्यास कारवाई करण्यात यावी. |
| उपआयुक्त (अतिक्रमण) | :नगर रचना विभागामार्फत इमारतीचे बांधकामाबाबत तपासणी करण्यात येईल. त्यानंतर त्यांचा अहवाल घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| मा.सभापती | :कर आकारणी संदर्भात संबंधीत विभागाने तात्काळ कारवाई करावी. तपासणी करुन कर आकारणी दंडासहीत वसुल करावी. |
| श्री.रावसाहेब आमले | :सदर इसम हा तात्कालिन आयुक्तांचे पी.ए. म्हणून राहिलेले आहे. |
| श्री.विकास एडके | :भगवान शिक्षण प्रसारक मंडळ 40 दिवसांची मुदत होती. मनपाच्या विरुध्द शासनाकडे गेलेला आहे. मनपा काय करत आहे? |
| सहा.सं.नगर रचना | :कुठलीही परवानगी ती जर मनपाने नाकारली त्यास अपील करण्याचा अधिकार आहे. राज्य शासन एम.आर.टी.पी. च्या ॲक्ट 47 अन्वये अर्जदार याने शासनाकडे अपिल करायचे. |
| श्री.विकास एडके | :परवानगी घेतली होती का? |
| सहा.सं.नगर रचना | :परवानगी घेतली होती. संबंधीताने अपिल केले होते. त्याने जास्तीच्या बांधकाम केलेले आहे. त्याचा एफ.एस.आय. महानगरपालिकेने द्यावा. पण हे अधिकार महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत नाही. म्हणून त्यांचा प्रस्ताव नामंजुर केला. नामंजुर केल्यानंतर Sec 47 खाली शासनाकडे अपिल करण्याचा अधिकार आहे. |
| श्री.अ.रहिम नाईकवाडी | :1966 च्या कलम 47 नुसार स्थगिती आणली. |
| मा.सभापती | :पुढील सुनावणी होईपर्यंत स्थगिती आहे. हा शासनाने घेतलेला निर्णय आहे. यात मनपा हस्तक्षेप करु शकत नाही. |
| श्रीमती कुरेशी | :याबाबत 8 पत्रे दिलेली आहे. उत्तर दिलेले नाही. |
| मा.सभापती | :त्वरीत लेखी उत्तर/माहिती देण्यात यावी. |
| श्री.विकास एडके | :पिया मार्केट अवैध रित्या बीअर शॉपी चालविण्यात येत आहे. परवाना कसा दिला? सिल का करण्यात आले नाही? |
| सहा.सं.नगर रचना | :स.सदस्यांनी या संदर्भात वारंवार पाठपुरावा केलेला आहे. प्रशसनाने संबंधीतास बीअर शॉपी चालवता येणार नाही म्हणुन तसेच या बाबत करारनाम्यानुसार बीअर शॉपीसाठी त्या ठिकाणी परवानगी नाही या बाबत नोटीस इश्यु केलेली आहे. संबंधीतांने जिल्हाधिकारी कार्यालयात अपिल केले आहे जिल्हाधिकारी कार्यालयात मी स्वत:हजर होतो. त्यांनी त्यांचे म्हणने मांडलेले आहे. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | :देवगीरी कॉलनी येथे 30 ते 35 हाजर लोकांची वस्ती आहे. त्या नागरीकांना पाण्याची सोय नाही. संबंधीत अधिकारी यांना विचारणा केली असता तेथील नागरीक कोर्टात गेलेले म्हणून सांगण्यात येते. अधिकारी यांना विचारणा कली असता समांतर मधून देण्यात येईल असे सांगण्यात येते. |
| कार्य.अभियंता | :देवगीरी कॉलनी येथील रहिवासी यांनी मा.उच्च न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मा.न्यायालयात (महानगरपालिकेकडे पाणी नाही, म्हणुन) Affidivate दाखल केले, एकूण 46 नागरीक त्या ठिकाणी राहतात. मुकूंदवाडीत शेवटच्या टप्प्यावर ही वस्ती आहे. 100 कनेक्शन टाकलेले आहे. एक टप्पा वाढणार आहे. नागरीकांनी टँकरचे पैसे भरुन दिल्यास टँकरने त्या भागात पाणीपुरवठा करण्यात येईल. |
| मा.सभापती | :पाणीपुरवठा संदर्भात तात्काळ कारवाई करण्यात यावी. |
| कार्यकारी अभियंता | :शिवाजीनगर येथील टाकी सुरु झाल्यावर सदरील वस्तीचा पाणीपुरवठा सुरळीत होईल. |
| श्री.गजानन बारवाल | :देवळाई-सातारा पाणीपुरवठा सुरळीत होईल त्या ठिकाणी पाण्याची सुविधा संदर्भात प्रश्न आहे. सदरील भागात कमी प्रमाणात पुरवठा होत आहे. |
| कार्यकारी अभियंता | :सातारा-देवळाई पाणीपुरवठा करणे संदर्भात निविदा प्रक्रिया सुरु आहे. |
| श्री.रावसाहेब आमले | :विहीरीचे कठडे तुटलेले आहे. या संदर्भात अधिकारी यांना सांगण्यात आले होते. |
| मा.सभापती | :(10 मिनीटांसाठी सभा तहकुब करण्यात येते. 10 मिनीटानंतर सभेला सुरूवात) |

**विषय क्र. 55 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती रिजवाना बेगम हैदरयार खॉ मुख्याध्यापिका प्रा.शा. सिल्कमिल कॉलनी केंद्र बन्सीलालनगर यांना त्यांचे पतीच्या हृदयरोगाचे वैद्यकीय उपचारार्थ सिग्मा इंन्स्टीट्युट ऑफ मेडीकल सायन्स हॉस्पीटल औरंगाबाद यांचेकडे दाखल करण्यात आले होते. त्यास्तव हॉस्पीटलच्या खर्चाचे अंदाजपत्रक तसेच शासन निर्णयातील तरतुदी नुसार संबंधीतांना जा.क्र./मनपा/शिक्षण/318/2015, दि.05/06/2015 अन्वये अग्रीम रक्कम रू.1,50,000/- प्रदान करणेत आलेले होते.

संबंधीतांनी दि.07/10/2015 च्या अर्जान्वये आवश्यक ती सर्व कागदपत्रे या कार्यालयास सादर करून घेतलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजन करणे व झालेला जास्तीचा खर्च प्रदान करणेची मागणी केली आहे. त्यानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी महानगरपालिका यांनी संपूर्ण प्रस्तावाच्या छाननी अंती केलेल्या शिफारशीनुसार संबंधीताने उपचार घेतलेले रूग्णालय सिग्मा हॉस्पीटल रघुवीरनगर औरंगाबाद हे रूग्णालय गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाची अद्यावत यादी दि.16/11/2011 पर्यंत मधील प्रसिध्द रूग्णालयाचे यादीत सदरील रूग्णालयाचे नाव समाविष्ट असून संबंधीताने केलेला एकूण खर्च रक्कम रू.4,88,225/- पैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.69986/- वजा जाता रू.4,18,239/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90% रक्कम रू.3,76,415/- इतकी होते. एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.24411/- मनपा फंडात जमा करता वैद्यकीय खर्चासाठी निव्वळ देय रक्कम रू.3,52,004/- इतकी होते, त्यामधुन देण्यात आलेली अग्रीम रक्कम रू.1,50,000/- वजा जाता आता संबंधीतास रू.2,02,004/- इतकी रक्कम देणे आहे.

उक्त रक्कम ही 2.00 लक्ष पेक्षा जास्त असल्याने ती अदा करणेसाठी मा.स्थायी समिती सभेची मंजुरी आवश्यक आहे. करिता वैद्यकीय खर्चापोटी मान्य रक्कम रू.3,52,004/- मधुन अग्रीम रक्कम रू.1,50,000/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.2,02,004/- ही श्रीमती रिजवाना बेगम हैदरयार खॉ मुख्याध्यापिका प्रा.शा. सिल्कमिल कॉलनी यांना अदा करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : वैद्यकीय परिपूर्ती संदर्भात शहरातील काही मोठ्या रुग्णालयांशी टायअप करण्यात यावे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : शासनमान्य हॉस्पीटलची यादी नुसार वैद्यकीय परतावा देण्यात येतो. खाजगी रुग्णालयांनी वैद्यकीय परिपुर्ती संदर्भात विचार करता येईल. कर्मचाऱ्यांना बील अदा करतांना सर्व बाबीं तसेच आजाराचा प्रकार याबाबतची यादी सभेच्या मान्यतेने केलेली आहे. त्यानुसार नमुद आजारा बाबत वैद्यकीय परतावा देण्यात येतो.

मा.सभापती : विषय क्र.55 ते विषय क्र.60-अ पर्यंत सर्व विषय मंजुर करण्यांत येतात. यामध्ये वैद्यकिय प्रतिपुर्तीचेही सर्व विषय मंजुर करण्यांत येतात. ऐनवेळचे विषयही मंजुर करण्यांत येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती रिजवाना बेगम हैदरयार खॉ मुख्याध्यापिका प्रा.शा. सिल्कमिल कॉलनी केंद्र बन्सीलालनगर यांनी त्यांचे पतीच्या हृदयरोगाचे वैद्यकीय उपचारार्थ झालेल्या खर्चासंबंधी आवश्यक ती सर्व कागदपत्रे कार्यालयास सादर करून एकूण खर्च रक्कम रू.4,88,225/- पैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.69986/- वजा जाता रू.4,18,239/- शिल्लक रक्कमेच्या 90% रक्कम रू.3,76,415/- आणि एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.24411/- मनपा फंडात जमा करून वैद्यकीय खर्चासाठी निव्वळ देय रक्कम रू.3,52,004/- व त्यामधुन त्यांना देण्यात आलेली अग्रीम रक्कम रू.1,50,000/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.2,02,004/- ही श्रीमती रिजवाना बेगम हैदरयार खॉ मुख्याध्यापिका प्रा.शा. सिल्कमिल कॉलनी यांना अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 56 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.मारोती नामदेव शेंडगे, माळी, प्राणी संग्रहालय विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या Ca Gall Bladder (कर्करोग) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, जालना रोड, औरंगाबाद येथे उपचार केलेला आहे. मनपा वैद्यकीय देयक परतावा विनियमामध्ये या आजाराचा गंभीर आजार म्हणुन समावेश आहे. त्या उपचारार्थी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची मागणी अर्जदाराने केली आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना Ca Gall Bladder (कर्करोग) उपचारार्थ एकूण केलेला खर्च रक्कम रू.2,33,972/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.15,167/- वजा करता रू.2,18,805/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90% रू.1,96,925/- इतकी होते. एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.11,699/- ही मनपा फंडात जमा करता निव्वळ देय रक्कम रू.1,85,226/- संबंधीतास अदा करावयाची आहे. संबंधीत कर्मचाऱ्यास उपचारासाठी नियमानुसार रूपये 1,50,000/- अग्रीम देण्यात आलेले आहे. संबंधीतास वैद्यकीय देयक परतावा एकूण रक्कम रूपये 1,85,226/- मधुन अग्रीम रक्कम रूपये 1,50,000/- वजा जाता शिल्लक रक्कम रूपये 35,226/- एवढी रक्कम अदा करणे आहे.

संबंधीताने उपचार सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, एमआयडीसी, चिकलठाणा, जालना रोड औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वेखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/ मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 16/11/2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे परिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेली खाजगी रूग्णालयाची अद्ययावत यादी दिनांक 16/11/2011 मधील प्रसिध्द रूग्णालय यादीत सदरील रूग्णालयाचे नाव समाविष्ठ आहे. सदरचा प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

संबंधीतास Ca Gall Bladder (कर्करोग) हे गंभीर स्वरूपाचे आजार असून शासन निर्णयाच्या अधिन राहून रक्कम रू.35,226/- अदा करण्यासाठी मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

करीता उपचाराकरीता झालेला एकूण खर्च रूपये 1,85,226/- मधून अग्रीम रक्कम रू.1,50,000/- चे समायोजन होऊन उर्वरीत रक्कम रू.35,226/- (पस्तीस हजार दोनशे सव्वीस रूपये) श्री.मारोती नामदेव शेंडगे, माळी, प्राणी संग्रहालय विभाग, महानगरपालिका औरंगाबाद हे दिनांक 07/02/2016 रोजी मृत्यु पावल्याने त्यांचे वारसास अदा करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.मारोती नामदेव शेंडगे, माळी, प्राणी संग्रहालय विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या Ca Gall Bladder (कर्करोग) या गंभीर आजारावर केलेल्या उपचारापोटी कार्यालयाकडे दाखल केलेल्या आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यामुळे, त्यांच्यावरील उपचारार्थ एकूण केलेला खर्च रक्कम रू.2,33,972/- त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.15,167/- वजा करता रू.2,18,805/- या शिल्लक रक्कमेच्या 90% रू.1,96,925/- व एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.11,699/- ही मनपा फंडात जमा करून निव्वळ देय असलेल्या रक्कम रू.1,85,226/- मधुन संबंधीतास देण्यांत आलेली अग्रीम रक्कम रूपये 1,50,000/- वजा जाता शिल्लक रक्कम रूपये 35,226/- (पस्तीस हजार दोनशे सव्वीस रूपये) एवढी रक्कम अदा करणेस मंजुरी देण्यांत येते. तसेच श्री.मारोती नामदेव शेंडगे, माळी, प्राणी संग्रहालय विभाग, महानगरपालिका औरंगाबाद हे दिनांक 07/02/2016 रोजी मृत्यु पावल्याने त्यांचे वारसास सदर रक्कम अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 57 :**

मा.आयुक्त यांचे मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा गाव येथील मुख्य पुलापासून ते महानगरपालिका कार्यालय व खंडोबा मंदिरा पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2013-2014 नुसार रक्कम रूपये 96,80,500/- चे तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त पाच निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.71% कमी दराची निविदा मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची आहे.

करीता मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.71% कमी दराचे निविदा पत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सातारा गाव येथील मुख्य पुलापासून ते महानगरपालिका कार्यालय व खंडोबा मंदिरा पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.71% कमी दराची असलेली मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 58 :**

मा.आयुक्त यांचे मंजुरीने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रेल्वेस्टेशन न.भू.क्र.19149 येथील व्यापारी संकुलातील मनपा हिश्यातील 580.00 चौ.मी. बांधीव क्षेत्र व 290 चौ.मी. वाहनतळ असलेली इमारत निविदा प्रक्रिया अंती मे.आयकॉन ईलेक्ट्रीकल्स यांना दिनांक 08/08/2014 रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक-42, अन्वये वार्षिक भाडे रक्कम रूपये 10,80,000=00 या दराने

म्हणजेच रूपये 90,000=00 (अक्षरी रूपये नव्वद हजार फक्त) प्रतीमाह भाडेपट्ट्यावर देण्यात आली असून संबंधीतासमवेत दिनांक 03/03/2015 रोजी भाडेपट्टा करारनामा दस्त करण्यात आलेला होता.

तथापी मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांचे पत्र जा.क्र.कक्ष-2/वेदांतनगर/इमारत भाडे/2016/ 4100, दिनांक 23/03/2016 अन्वये सदर इमारत क्रांतीचौक पोलीस ठाणेचे विभाजनानंतर वेदांतनगर पोलीस ठाणे कार्यालयासाठी तात्पुरत्या भाडेपट्टा स्वरूपात वापरासाठी भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केली आहे.

भाडेपट्टा स्वरूपात मागणीस अनुसरून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंजुर भाडे निश्चितीनुसार प्रतीमाह भाडे आकारणीचा दर रूपये 96,600=00 (अक्षरी रूपये शहान्नव हजार सहाशे फक्त) प्रतीमाह एवढा निश्चित असून त्यानुसार वार्षिक भाडे रक्कम रूपये 11,59,200=00 आकारणीसह पोलीस विभागास तीन वर्ष कालावधीसाठी दरवर्षी 10% भाडे वाढीसह आकारणी खालील नुसार आहे.

| कालावधी | भाडे रक्कम | प्रति वर्ष 10% वाढीनुसार भाडे रक्कम |
|---|---|---|
| 01/04/2016 ते 31/03/2017 | 11,59,200=00 | --- |
| 01/04/2017 ते 31/03/2018 | --- | 12,75,120=00 |
| 01/04/2018 ते 31/03/2019 | --- | 14,02,632=00 |

पहिल्या तीन वर्षासाठी इमारत प्रायोगिक तत्वावर भाड्याने देणेस व भाडेपट्टा करारनामा मधील नमुद अटी शर्तीचे पालन समाधानकारक आढळल्यास पुढील कालावधीसाठी भाडेपट्टा (पुढील तीन वर्षासाठी) मुदतवाढ देय राहील. तसेच दिनांक 01 एप्रिल 2016 पासून भाडेतत्वावर देणेसाठी मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. या अनुषंगाने दिनांक 28/03/2016 अन्वये सदर इमारतीचा ताबा पोलीस विभागास आगावू (Advance Possession) देण्यात आलेले आहे.

करिता मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स यांचे समवेत करण्यात आलेला भाडेपट्टा करारनामा रद्द करणे आणि त्यांनी भरणा केलेली रक्कम रूपये 10,80,000/- (अक्षरी रूपये दहा लक्ष ऐंशी हजार फक्त) परत करणे आणि सदर इमारत पहिल्या वर्षासाठी पोलीस आयुक्त कार्यालयास वार्षिक भाडे रक्कम रूपये 11,59,200/- (अक्षरी रूपये अकरा लक्ष एकोणसाठी हजार दोनशे फक्त) या दराने देणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या कार्योत्तर मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन न.भू.क्र. 19149 येथील व्यापारी संकुलातील मनपा हिश्यातील 580.00 चौ.मी. बांधीव क्षेत्र व 290 चौ.मी. वाहनतळ असलेली इमारतीसंबंधी मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स यांचे समवेत करण्यात आलेला भाडेपट्टा करारनामा रद्द करणेस आणि त्यांनी भरणा केलेली रक्कम रूपये 10,80,000/- (अक्षरी रूपये दहा लक्ष ऐंशी हजार फक्त) परत देणेस तसेच सदर इमारत तीन वर्षासाठी पोलीस आयुक्त कार्यालयास प्रतीमाह र.रूपये 96,600=00 (अक्षरी रूपये शहान्नव हजार सहाशे फक्त) दरानुसार व वार्षिक भाडे रक्कम रूपये 11,59,200=00 आकारणीसह पोलीस विभागास तीन वर्षासाठी खालीलप्रमाणे दरानुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यांत येते.

| कालावधी | भाडे रक्कम | प्रति वर्ष 10% वाढीनुसार भाडे रक्कम |
|---|---|---|
| 01/04/2016 ते 31/03/2017 | 11,59,200=00 | --- |
| 01/04/2017 ते 31/03/2018 | --- | 12,75,120=00 |
| 01/04/2018 ते 31/03/2019 | --- | 14,02,632=00 |

तसेच पहिल्या तीन वर्षासाठी इमारत प्रायोगिक तत्वावर भाड्याने देणेस व भाडेपट्टा करारनामा मधील नमुद अटी शर्तीचे पालन समाधानकारक आढळल्यास पुढील कालावधीसाठी भाडेपट्टा (पुढील तीन वर्षासाठी) मुदतवाढ देय राहील, यासह कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 59 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 ची प्रत्यक्ष अंमलबजावणी औरंगाबाद महानगरपालिका परीक्षेत्रासाठी सन 2002 पासुन करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने दि.18 मे 2001 च्या आदेशान्वये प्रशमन शुल्क विकास आकाराचे दर ठरवुन दिले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेने दि.18/02/2002 विषय क्र.566/05 च्या ठरावाने शासनाने ठरवुन दिलेल्या दराच्या 50% कमी दराने प्रशमन शुल्क व विकास आकाराची आकारणी करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. शासनाने ठरवुन दिलेले दर विहीत केलेल्या कमालमर्यादेच्या अधिन राहून निर्धारित करण्याचे अधिकार दि.18 मे 2001 च्या मुख्यमंत्री महोदय यांच्या बैठकीतील आदेशान्वये नियोजन प्राधिकरणास प्रदान करण्यात आले आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 अंतर्गत नियमाधिन करण्यात आलेल्या वसाहतीमधील पायाभुत सुविधा या नियमाधिन करण्यात आलेल्या वसाहतीमधील प्राप्त विकास आकार व प्रशमन शुल्कामधुन करावेत, अशी स्पष्ट तरतुद महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 मधील कलम (6) मध्ये आहे. शासनाने ठरवुन दिलेल्या दराच्या 50% कमी दराने प्रशमन शुल्क व विकास आकाराची वसुली केल्याने, जमा होणारा विकास आकार हा पायाभुत सोयी सुविधा देण्यासाठी अपुरा आहे. प्राप्त विकास आकारातुन संपूर्ण वसाहतीमधील विकास कामे करणे शक्य होत नाही. शासनाने ठरवुन दिलेला दर हा 2001 सालचा आहे. व गुंठेवारी कायदा अस्तित्वात येऊन साधारणतः चौदा (14) वर्ष झालेली आहेत. त्यामुळे आज रोजीच्या विकास कामाचा दर व 2001 सालचा दर यात मोठी तफावत आहे. नगर रचना विभागामार्फत अधिकृतरित्या मंजुर रेखाकंनासाठी Betterment Charges2010-11च्या अर्थसंकल्पानुसार 2015-16 साठी रू.700/- प्रती चौ.मी. ने आकारले जातात. व गुंठेवारीसाठी मा.सर्वसाधारण सभेने ठरवुन दिलेला दर हा रू.120/-प्रती चौ.मी. आहे. रू.120/- प्रती चौ.मी. हा दर रू.700/- प्रती चौ.मी. च्या तुलनेत खुपच कमी आहे.

गुंठेवारी प्रशमन शुल्क/विकास आकार व नगर रचना विभागामार्फत आकारत असलेल्या Betterment Charges मध्ये साम्य असायला हवे, कारण गुंठेवारी क्षेत्रात जी विकास कामे करावी लागणार आहे, त्याचा खर्च जास्ता असतो. आणि प्रशमन शुल्क मात्र कमी आहे. तरी गुंठेवारी क्षेत्रात सुविधा / विकास कामे करावयाची झाल्यास Betterment Charges च्या दराने प्रशमन शुल्क देखील वसुल करणे योग्य राहील, असा अभिप्राय मा.शहर अभियंता यांनी दिला आहे.

रू.700/- प्रती चौ.मी. दराने गुंठेवारी अंतर्गत प्रशमन शुल्क /विकास आकार जमा केल्यास, अनाधिकृत वसाहतीमध्ये सोयी सुविधा देणे शक्य होईल. व महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 चा मुख्य हेतु अनाधिकृत वसाहतीमध्ये सोयी सुविधा देऊन श्रेणीवाढ करणे हा आहे. हा हेतु साध्य करण्यासाठी गुंठेवारी करीता विकास आकाराचा दर रू.700/- प्रती चौ.मी. दराने आकारणी करणे योग्य राहील, करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 अंतर्गत नियमाधिन करण्यात आलेल्या वसाहतीमधील पायाभुत सुविधा या नियमाधिन करण्यात आलेल्या वसाहतीमधील प्राप्त विकास आकार व प्रशमन शुल्कामधुन करावेत, अशी स्पष्ट तरतुद महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 मधील कलम (6) मध्ये आहे. शासनाने ठरवुन दिलेल्या दराच्या 50% कमी दराने प्रशमन शुल्क व विकास आकाराची वसुली केल्याने, जमा होणारा विकास आकार हा पायाभुत सोयी सुविधा देण्यासाठी अपुरा आहे. प्राप्त विकास आकारातुन संपूर्ण वसाहतीमधील विकास कामे करणे शक्य होत नाही. शासनाने ठरवुन दिलेला दर हा 2001 सालचा आहे. व गुंठेवारी कायदा अस्तित्वात येऊन साधारणतः चौदा (14) वर्ष झालेली आहेत. त्यामुळे आज रोजीच्या विकास कामाचा दर व 2001 सालचा दर यात मोठी तफावत आहे. नगर

रचना विभागामार्फत अधिकृतरित्या मंजुर रेखाकंनासाठी Betterment Charges 2010-11 च्या अर्थसंकल्पानुसार 2015-16 साठी रू.700/- प्रती चौ.मी. ने आकारले जातात. व गुंठेवारीसाठी मा.सर्वसाधारण सभेने ठरवुन दिलेला दर हा रू.120/- प्रती चौ.मी. आहे. रू.120/- प्रती चौ.मी. हा दर रू.700/- प्रती चौ.मी. च्या तुलनेत खुपच कमी असल्याने व गुंठेवारी प्रशमन शुल्क/विकास आकार व नगर रचना विभागामार्फत आकारत असलेल्या Betterment Charges मध्ये साम्य असायला हवे, कारण गुंठेवारी क्षेत्रात जी विकास कामे करावी लागणार असून त्याचा खर्च जास्त असतो आणि प्रशमन शुल्क मात्र कमी असल्याने व गुंठेवारी क्षेत्रात सुविधा / विकास कामे करावयाची झाल्यास Betterment Charges च्या दराने प्रशमन शुल्क देखील वसुल करणे योग्य राहील, असा अभिप्राय मा.शहर अभियंता यांनी दिला असल्याने, रू.700/- प्रती चौ.मी. दराने गुंठेवारी अंतर्गत प्रशमन शुल्क /विकास आकार जमा करणेस व अनाधिकृत वसाहतीमध्ये सोयी सुविधा देणे व महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम 2001 चा मुख्य हेतु अनाधिकृत वसाहतीमध्ये सोयी सुविधा देऊन श्रेणीवाढ करणे हा हेतु साध्य करण्यासाठी गुंठेवारी करीता विकास आकाराचा दर रू.700/- प्रती चौ.मी. दराने आकारणी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 60 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता वार्ड फ, यांनी त्यांच्या स्वतःच्या आजारपणावर शासनमान्य रूग्णालयाच्या यादीत समाविष्ट असलेल्या कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स रूग्णालय, सिकंदराबाद येथे स्वतःच्या Incisional Hernia Surgery (Acute Abdomen) या आजारावर उपचार केला असून त्या उपचारावरील एकुण खर्च रक्कम रू.2,67,256/- इतक्या वैद्यकीय खर्चाच्या परताव्याची मागणी केली आहे.

शासन निर्णय क्र.एमएजी 2005/9/प्र.क्र.1/आरोग्य 3 मंत्रालय, मुंबई 32 दि.19 मार्च 2005 नुसार खर्चाच्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे करण्यात आलेला आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **एकुण खर्च रूपये** | - | **2,67,256/-** | |
| 01. | औषोधोपचारावरील प्रत्यक्ष खर्च रू. | - | 1,39,627/- | |
| | प्रत्यक्ष खर्चाच्या 90 टक्के रक्कम रू. | - | 1,25,664/- | (अ) |
| 02. | बाथरूमसह स्वतंत्र कक्ष प्रत्यक्ष खर्च रू. | - | 1,27,629/- | |
| | वातानुकुलित कक्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या 75 टक्के रक्कम रू. | - | 95,722/- | (ब) |
| | (अ) + (ब) रक्कम रू. | - | 2,21,386/- | |

एकुण खर्चाच्या 5 टक्के रक्कम रू.13,363/- मनपा फंडात जमा करणे योग्य राहील. (अ) + (ब) रक्कम रू.2,21,386/- मधुन खर्चाच्या 5 टक्के रक्कम रू.13,363/- जमा करून एकुण निव्वळ देय रक्कम रू.2,08,023/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार घेतलेले कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स रूग्णालय, सिंकदराबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. वेखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2, मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 16/11/2011 शासन परिपत्रक क्र.वेखप्र-2013/प्र.क्र.291/13/राकावि-2 मंत्रालय, मुंबई-32 दि.11/10/2013 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट -अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियानी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाची अद्ययावत यादी दि.16/10/2013 पर्यंत प्रसिध्द रूग्णालय यादीत सदरील रूग्णालयाचे नांव समाविष्ट आहे.

सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे. करीता संबंधीतास रक्कम रू.2,08,023/- वैद्यकीय प्रतिपुर्ती रक्कम श्री.सुधाकर

ओंकार पवार, शाखा अभियंता, वार्ड फ महानगरपालिका औरंगाबाद यांना अदा करणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता वार्ड फ, यांनी त्यांच्या स्वतःच्या आजारपणावर शासनमान्य रूग्णालयाच्या यादीत समाविष्ट असलेल्या कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्स रूग्णालय, सिकंदराबाद येथे स्वतःच्या Incisional Hernia Surgery (Acute Abdomen) या आजारावर केलेल्या उपचारापोटी दाखल केलेल्या एकुण खर्च रक्कम रू.2,67,256/- इतक्या वैद्यकीय खर्चाच्या (अ) + (ब) नुसार रक्कम रू.2,21,386/- व एकुण खर्चाच्या 5 टक्के रक्कम रू.13,363/- मनपा फंडात जमा करून एकुण निव्वळ देय असलेली रक्कम रू.2,08,023/- श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वार्ड फ महानगरपालिका औरंगाबाद यांना अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 60-अ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.एस.एम.जाधव (शाखा अभियंता), वार्ड ब यांनी त्यांच्या स्वतःच्या Angiography done for k/c/o IHD with Coronary Artery Bypass Surgery (तीव्र हृदयरोग) यावर उपचार करण्यासाठी एकुण रू.4,15,629/- इतका खर्च केला असून त्यापैकी देय नसलेली रक्कम रू.63,842/- वजा करता रू.3,51,787/- इतकी शिल्लक रक्कम राहते.

| | |
|---|---|
| (अ) एकुण खर्च रक्कम रू. | 4,15,629/- |
| (-) वजा अनुज्ञेय नसलेली रक्कम रू. | 63,842 |
| शिल्लक रक्कम रू. | 3,51,787/- |
| (ब) एकुण शिल्लक 90 टक्के र.रू. | 3,16,608/- |
| (-) वजा मनपा फंडात 5 टक्के जमा र.रू. | 20,781/- |
| ('अ' एकुण खर्चाच्या रक्कमेपैकी) | |
| एकूण निव्वळ देय रक्कम रू. | 2,95,827/- |

संबंधीताने उपचार घेतलेले सेठ नंदलाल धुत रूग्णालय, औरंगाबाद व एन.एम.वाडीया रूग्णालय पुणे हे असून महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. वेखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2, मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 16/11/2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट -अ शासकीय कर्मचारी / कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाची अद्ययावत यादी दि.16/11/2011 व शासन परिपत्रक क्र.वेखप्र-2013/प्र.क्र.291/13/राकावि-2 मंत्रालय, मुंबई-32 दि.11/10/2013 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी / कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाची अद्ययावत यादी दि.16/10/2013 पर्यंत प्रसिध्द रूग्णालयांच्या यादीत सदरील दोन्ही रूग्णालयांचे नाव समाविष्ट आहे.

वरील शासन निर्णय मधील परिच्छेद 1 अन्वये प्रतिपुर्तीच्या अनुज्ञयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून शासन मान्य आजारांसाठी खाजगी रूग्णालयात उपचार घेतल्यास रू.1,00,000/- (एक लाख रू.) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना (जिल्हा/नगर परिषदेत/महानगरपालिकेत/नगरपालिकेत आरोग्य अधिकारी यांना) प्रदान करण्यात आले. तसेच रू.1,00,000/- (एक लाख रू.) पेक्षा जास्त वैद्यकीय रक्कमेस मंजुरीचे अधिकार मा.आयुक्त यांना असून र.रू.2,00,000/- (दोन लाख रू.) पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस

मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदरील वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.18/04/2016 रोजी मान्यता दिलेली आहे.

करिता संबंधीतास वैद्यकीय देयकाचा परतावा म्हणुन रक्कम रू.2,95,827/- (दोन लक्ष पंच्यान्नव हजार आठशे सत्तावीस रू. फक्त) एवढी रक्कम श्री.सुनिल मुरलीधर जाधव, शाखा अभियंता यांना अदा करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.एस.एम.जाधव (शाखा अभियंता), वार्ड ब यांनी त्यांच्या स्वतःच्या Angiography done for k/c/o IHD with Coronary Artery Bypass Surgery (तीव्र हृदयरोग) यावर उपचार करण्यासाठी एकुण रू.4,15,629/- इतका खर्च केला असून त्यापैकी देय नसलेली रक्कम रू.63,842/- वजा जाता रू.3,51,787/- राहते. एकुण शिल्लक रक्कम रू.3,51,787/- च्या 90 टक्के र.रू.3,16,608/- व या रक्कमेमधुन 5 टक्के रक्कम रू.20,781/- मनपा फंडात जमा करून उर्वरीत निव्वळ देय असलेली रक्कम रू.2,95,827/- (दोन लक्ष पंच्यान्नव हजार आठशे सत्तावीस रू. फक्त) श्री.सुनिल मुरलीधर जाधव, शाखा अभियंता यांना अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्रीमती कुरैशी : एम.आर.टी.पी. ॲक्ट कलम 47 खुलासा करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :11000 स्के.मी. जागा आहे. त्या जागेची आजची किंमत 5 कोटी रुपये आहे, त्या ठिकाणी सांस्कृतीक सभागृह तयार करायचे आहे.

उपआयुक्त (मालमत्ता) :याबाबत माहिती घेवून माहिती सादर करण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :महाराजा उद्यान म्हणून जागा आहे. त्या ठिकाणचा माळी त्या जागेचा वापर करतात आणि तो कामही करत नाही.

उपआयुक्त (मालमत्ता) :याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नितीन चित्ते : अनुसुचित जाती, नवबौध्द घटकांसाठी शासनाने शौचालयासाठी निधी दिला होता तो परत गेलेला आहे. निधी प्राप्त होण्याकरीता शासनाच्या निर्देशानुसार मुदतीत पैसे भरले न गेल्यामुळे शासनाकडे निधी परत गेलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेला 37 कोटीची शासनाची मंजुरी मिळालेली होती त्यापैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे याचंकडून तांत्रिक मान्यतेने 27 कोटींचा मिळाला होता परंतु महानगरपालिकेने तांत्रिक मुल्याकंनाची एक टक्का फिस न भरल्या गेल्यामुळे सदर निधी मिळालेला नाही. यामध्ये सदर एजन्सीची कुठलीही चुक नाही. ज्या एजन्सीला काम दिले होते, त्या एजन्सीने कारानाम्यानुसार डिपीआर तयार करून दिलेला आहे आता सदरील एजन्सीने देयक देण्याचा तगादा लावलेला आहे. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियाना अंतर्गत नागरी भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील कुटूंबीयासाठी वैयक्तिक शौचालय व खाजगी नळ जोडणी कामाची योजना राबवण्यात आली होती. या कामासाठी युवा सुशिक्षित बेरोजगार संस्था सिडको औरंगाबाद यांना काम देण्यात आले होते. खालील करारनाम्यानुसार जनजागृती करणे DPR नियमानुसार निविदे प्रक्रियेद्वारे सर्व प्रक्रिया झालेली आहे. परंतु करारनाम्यानुसार संबंधीत एजन्सीला पैसे मिळालेले नाही. ज्या एजन्सीने काम केलेले आहे ते अपंग, दलित आहे. याबाबत संबंधीत विभागाकडून खुलासा घेणे योग्य होईल.

उपआयुक्त (श्री.अय्युब खान) : दिनांक 05/06/2010 रोजी जाहिर प्रगटन देण्यात आले, शौचालय बांधण्याची तसेच नळ जोडणीचे काम जाहिर प्रगटन देवुन काम देण्यात आले, निविदा मंजूर झाल्यावर युवा सुशिक्षित बेरोजगार संस्थेला तत्कालिन मा.स्थायी समिती दिनांक 25.10.2010 ठराव क्रमांक 62 नुसार मंजूरी दिली. युवा सुशिक्षित बेरोजगार संस्थेला एकुण 1 कोटी 63 लाख रूपये मोबदला अदा करावयाचा होता, त्यापैकी 48 लाख मोबदला दिलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे याचंकडुन तांत्रिक मान्यतेने 27 कोटींचा मिळाला होता परंतु महानगरपालिकेने तांत्रिक मुल्यांकनाची एक टक्का फिस तातडीने (30 लाख 64 हजार रूपये) न भरल्या गेल्यामुळे सदर निधी महानगरपालिकेला मिळालेला नाही. सर्वे करून नियमानुसार आठ पैकी सहा कामे सदर एजन्सीने केलेले आहे. संबंधीत एजन्सीस पेमेंट देणे आवश्यक होते,

01. सर्वेक्षणासाठी फॉर्म छापुन जनजागृती करणे रिक्शा लावणे.
02. कर्मचाऱ्यांद्वारे सर्वेक्षण करून लाभार्थी निश्चित करणे.
03. सविस्तर प्रकल्प अहवाल DPR तयार करून देणे.
04. प्रकल्प प्रस्तावास शासनाची तत्वतः मान्यता घेणे.
05. प्रकल्प अहवालास तत्वतः मान्यता घेतल्यानंतर शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे शासनाच्या नोडल एजन्सी एमजीपी ची तांत्रिक मान्यता घेणे.
06. प्रकल्प प्रस्तावास तांत्रिक मान्यता घेतल्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे.
07. लाभार्थी यांची बायोमेट्रीक व फोटो घेणे.
08. लाभार्थी हिस्सा घेवून मनपाकडे जमा करणे.

उपआयुक्त (श्री.अय्युब खान) : जे कामे त्यांना करारनाम्यानुसार देण्यात आले होते त्या पैकी डिजिटल फोटो आणि लाभार्थ्यांची 10 टक्के रक्कम जमा केलेली नाही.

श्री.नितीन चित्ते : पेमेंट न देण्याचे कारण काय? आपल्या करारनाम्यानुसार रक्कम देणे आवश्यक आहे.

उपआयुक्त (श्री.अय्युब खान) : शासनाचा निधी आला नाही. तो परत गेला आहे. या प्रकरणामध्ये चौकशी झालेली आहे. मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल आलेला आहे.

मा.सभापती : संबंधीत युवा संस्थेस एकुण प्रकल्प किमंतीच्या 6% दराने काम देण्यात आले होते. संबंधीत संस्थेस एकुण देयकापैकी र.रू.48 लक्ष अदा करण्यांत आलेले आहे. तसेच सदर संस्थेने अ.क्र.1 ते 6 मुद्यानुसारच काम केलेले असल्यामुळे सदर संस्थेस 8 मुद्यापैकी 6 मुद्याचीच रक्कम तीन टप्प्यात अदा करण्यास मान्यता देण्यांत येते. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

विधी सल्लागार :एम.आर.टी.पी.ॲक्ट 47 नुसार पुढील सुनावणी होईपर्यंत कारवाई करता येणार नाही. मनपाने परवानगी नाकारली आहे. परवानगी नाकारल्याच्या 40 दिवसानंतर अपिल राज्य शासनाकडे करण्याचा अधिकार आहे.

श्रीमती कुरैशी :याबाबत लेखी उत्तर देण्यात यावे.

विधी सल्लागार :लेखी उत्तर देण्यात येईल.

मा.सभापती :ए-1 रेट लिस्टचे कामे तपासून सर्व कामांचे बीले देण्यात यावे, या संबंधीच्या अहवाल सादर करण्यात यावा.

श्रीमती शेख समिना :मंगल कार्यालयाची नोंद बाबत माहिती देण्यात यावी. शहरात 300 च्या वर मंगल कार्यालय आहे. नोंदणी फक्त 96 मंगल कार्यालयाची आहे.

मा.सभापती :सर्वे करुन दंडासह वसुली करण्यात यावी. अनाधिकृत असेल तर सिल लावण्यात यावे.

श्री.नितीन चित्ते : हर्सुल तलावातील मत्स्य व्यवसायाचा ठेका जहागीरदार मीर रजा अली यांना देण्यांत आला होता. परंतु यावर्षी मोठ्या प्रमाणात दुष्काळ असल्यामुळे, तेथे मत्स्य व्यवसाय होऊ शकला नाही. त्यामुळे संबंधीत ठेकेदाराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. संबंधीताने स्थायी समितीकडे विनंती केली आहे, त्यास ठेका माफी देण्यांत यावी व पुढील दोन वर्षापर्यंत ठेका वाढवून द्यावा. संबंधीतास यावर्षी ठेका माफी देवून पुढील दोन वर्षासाठी 10 टक्के नैसर्गिक वाढ धरून ठेका वाढवुन द्यावा.

मा.सभापती : मत्स्य व्यवसायासाठी हर्सुल येथे देण्यात आलेल्या ठेकेदाराने अर्जाद्वारे विनंती केली आहे, यावर्षी हर्सुल तलावामध्ये पाणी नसल्यामुळे त्याचे मोठे नुकसान झालेले आहे. संबंधीत ठेकेदाराने ठेका माफी देण्याची मागणी केली असल्यामुळे व खरोखरच मोठ्या प्रमाणात दुष्काळ असल्यामुळे संबंधीतास ठेका माफी देण्यांत येते तसेच संबंधीतास सद्यस्थितीत देण्यांत आलेल्या ठेक्याची मुदत संपल्यानंतर त्यापुढील दोन वर्षासाठी 10% नैसर्गिक वाढ धरून ठेका वाढवून देण्यास मंजुरी देण्यांत येते. याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

श्री.नितीन चित्ते : मनपा सार्वत्रिक निवडणूक एप्रिल 2015 साठी निवडणुक निर्णय अधिकारी-9 यांचे कार्यालय जवाहर कॉलनी येथील मनपा शाळेमध्ये होते. या ठिकाणी निवडणूकीसाठी असलेल्या कर्मचाऱ्यांची जेवणाची व्यवस्था मनपा शाळेसमोर असलेल्या यशवंत कला महाविद्यालयातील कँटीन चालक श्री.दत्ता खैरे यांचेकडे देण्यांत आली होती. मनपाचे निवडणुक निर्णय अधिकारी-2, श्री.एम.एम.खान, शाखा अभियंता यांनी श्री.दत्ता खैरे यांना सांगुन जेवणाची व्यवस्था केली होती. संबंधीत कँटीनचे र.रू.47800/- चे बील झाले होते. त्यावेळेस श्री.एम.एम.खान, शाखा अभियंता यांनी त्यांना र.रू.20,000/- बील अदा केले. व उर्वरीत रक्कम नंतर देऊ म्हणुन सांगितले. परंतु संबंधीत कँटीन धारकाचे बील श्री.एम.एम.खान, शाखा अभियंता यांनी आजपर्यंत अदा केलेले नाही. कँटीन धारकाने याबाबत मनपाचे उबंरठे झिजवले, लोकशाही दिन, विभागीय लोकशाही दिनात सुध्दा तक्रारी केलेल्या आहेत. परंतु आजपर्यंत संबंधीतास न्याय देण्यांत आलेला नाही. तरी संबंधीत कँटीन धारकाचे पैसे तात्काळ अदा करण्यासाठी प्रशासनास आदेशित करावे.

मा.आयुक्त : संचिका तपासुन कार्यवाही करण्यांत येईल.

मा.सभापती : संचिका तपासून संबंधीत कँटीन चालकाचे उर्वरीत र.रू.27800/- चे बील अदा करण्याची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद